स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन विषय

´मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतून चित्रित झालेले स्त्री जीवन : एक चिकित्सक अभ्यास´

(विशेष संदर्भ – मातीखालचे पाय, आमदार सौभाग्यवती, गणगोत, असं जगणं तोलाचं, तृप्ता)

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी या विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक

वैशाली श्रीरंग पतंगे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. माधव राघोजी जाधव
मराठी विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर,
ता.कळमनूरी जि. हिंगोली

डिसेंबर २०२४

अनुक्रमणिका

प्रस्तावना

१) संशोधन विषयाची निवड

२) संशोधन क्षेत्र

३) संशोधनाचे महत्त्व

४) संशोधनाची उद्दिष्टे

५) संशोधनाची गृहीतके

६) संशोधन पद्धती

७) संशोधनाची मर्यादा

८) संशोधन प्रकरणाची रचना

९) संशोधन प्रकरणाचा संक्षिप्त आराखडा

१०) संदर्भग्रंथ सूची.

❖ प्रस्तावना :-

मराठवाड्याच्या ग्रामीण साहित्यात कादंबरी वाङ्मय प्रकारचा प्रांत समृद्ध आहे. गणेश आवटे, रेखा बैजल, रा. रं.बोराडे, बाबू बिरादार, शेषराव मोहिते, आदी मान्यवर साहित्यकांनी या प्रवाहाला पाठबळ दिल्याने हा प्रवाह अधिक गतिमान झालेला आहे. माती खालचे पाय, आमदार सौभाग्यवती, गणगोत, असं जगणं तोलाचं, तृप्ता, अशा कादंबऱ्यांनी मराठी वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. या कादंबऱ्या विविध अंगांनी स्त्री जीवनाच्या वेगवेगळ्या पैलूवर प्रकाश टाकतात. या कादंबऱ्यांमधून मराठवाड्यातील स्त्री जीवन उलगडतं, जिथे तिला तिच्या समाजात, कुटुंबात आणि समाजात एक अडचणीचं आणि संघर्षाच चित्र दिसून येत असते. स्त्रियांच्या स्वातंत्र्याची मनिषा, तिच्या दृढ इच्छा, तिच्या तडजोडी अशा सगळ्या गोष्टी ग्रामीण कादंबऱ्यामध्ये अत्यंत सहजतेने व्यक्त होत असतात. प्रत्येक कादंबरीत त्या काळाच्या ग्रामीण जीवनातीत सामाजिक, संस्कृतीक व राजकीय, शैक्षणिक आणि मानसिक परिस्थिती व्यक्त करण्यात आलेली आहे. त्यामध्ये स्त्रियांना परंपरेत गावेलेले असते. तरी ती तिच्या आवाजाला एक जागा मिळवण्यासाठी जटिल प्रवास करते. कादंबऱ्यामधून आपल्याला असं चित्र दिसतं की, ग्रामीण भागातील स्त्री आपल्या जीवनातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी कधी तडजोड करते. तर कधी ती आपल्या अस्तित्वासाठी लढत असतांना दिसून येते.

कादंबरी हा मुक्त वाङ्मय प्रकार मानला जातो. आधुनिक कालखंडातील विविध कादंबरीकरानी केलेल्या दर्जेदार लेखनामुळे व प्रयोगशीलतेमुळे ही परंपरा अधिक समृद्ध झालेली आहे. मराठवाड्यातील अनेक ग्रामीण कादंबरी लेखकांनी ग्रामीण जीवन चित्रीत केले आहे. १९ व्या शतकापासून आज २१ व्या शतकापर्यंत अनेक महत्वपूर्ण अशा ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत.

कथा, नाटक, कविता, यांची परंपरा मराठवाड्यात फार प्राचीन काळापासून दिसून येते. मात्र कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा उदय इंग्रजी साहित्यातून भारतात आला आहे. प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृतीच्या अधिपत्याखाली वावरणारी स्त्री अत्यत संघर्ष करणारी आहे. निजामी राजवटीतही या प्रदेशातील स्त्रियांचा खूप मोठ्या प्रमाणात छळ केला गेला आहे. या प्रदेशातील स्त्रि आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार निमुटपणे सहन करत असते. याविषयी ती कुठेही कैफियत मांडत नाही. यावरून तिची सहनशीलता व संयमी वृत्ती किती प्रबल होती हे स्पष्ट दिसून येते.

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबऱ्यातून येणारी स्त्री ही जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सतत संघर्षमय जीवन जगत असताना दिसून येते. हा धागा पकडून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

❖ संशोधन विषयाची निवड :-

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतील स्त्रियांचे जीवन एक अत्यंत सखोल आणि विविध पैलूंनी भरलेले आहे. स्त्रियांचे जीवन हे संघर्ष, स्वप्न, आशा आणि वेदनांचा संगम आहे. स्त्रियांचे जीवन प्रेम, संघर्ष, प्रगती आणि आत्मनिर्भरतेच्या विविध रूपांमध्ये उजळलेले आहे.

ग्रामीण कादंबरीतील स्त्री कुटुंबांसाठी, शिक्षणासाठी आणि समाजातील स्थानासाठी सतत संघर्ष करत असताना दिसून येते. कधी कुटुंबाच्या संरक्षणासाठी तर कधी स्वप्राच्या मागे धावता, धावता स्त्रियांच्या जीवनात बदल होतांना दिसतो. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबऱ्यातून स्त्रियांचे जीवन स्थान व भूमिका जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आलेला आहे.

❖ संशोधन क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधनात फक्त मराठवाड्यातील ग्रामीण कादंबऱ्यापैकी काही निवडक कादंबऱ्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे या संशोधन कार्याची व्याप्ती ग्रामीण कादंबऱ्यातीत स्त्री जीवन एवढ्या पुरतीच मर्यादित आहे.

❖ प्रस्तुत संशोधनाचे महत्व :-

मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यात स्त्री जीवनाचे चित्रण या विषयावर फार संशोधन झाले नाही. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवन हे अत्यंत उपयुक्त आणि आकर्षक आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन समाजामध्ये अनेक बंधनात अडकलेले आहे. स्त्रियांना कुटुंबासाठी तग धरून काम करणे व तसेच शेतकामात सहभाग घेणे, रूढी व परंपरांशी संघर्ष करत स्वतःला सिद्ध करणे. या सर्व बाबींचे प्रमुख स्थान ग्रामीण भागात स्त्रियांच्या जीवनात दिसून येते.

स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक व शैक्षणिक संघर्ष ग्रामीण कादंबऱ्या दिसून येते. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या जीवनात शिक्षणाची कमतरता, आरोग्य सेवा व वेगवेगळ्या भूमिकेमुळे येणाऱ्या मर्यादा कधी घर काम तर कधी शेतकाम दोन्ही कामे सांभाळावी लागतात. तिच्या जीवनात अडचणी आणि संघर्ष जास्त प्रमाणात दिसून येत असतो.

स्त्रियांचे जीवन आणि तिच्या संघर्षाचे चित्र ग्रामीण साहित्यामध्ये पूर्वीपासूनच आलेले आहे. हे चित्र समाजासमोर आणून आज स्त्रियांच्या जीवनाची प्रासंगिकता समाजासमोर आणणे हा उद्देश आणि महत्त्व सदरील संशोधनाचे आहे. महत्त्वाची बाब सांगायची म्हणजे म्हणावे तेवढे संशोधन या विषयावर केले गेले नाही. म्हणूनच हा विषय संशोधनासाठी निवडला गेला आहे.

❖ संशोधन विषयाचे उदिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संशोधकाने खालील उदिष्ट्ये निश्चित केली आहेत.

१. ग्रामीण कादंबऱ्यांचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण कादंबऱ्यातून चित्रित झालेल्या स्त्री जीवनाचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण कादंबऱ्यातील समाज वास्तव व ग्रामीण भागातील जीवनशैली समजून घेणे.

४. ग्रामीण कादंबऱ्यातील स्त्रियांच्या जीवनाची प्रासंगिकता समजून घेणे.

५. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतून आलेले स्त्री जीवनविषयक दृष्टिकोन अभ्यासणे.

❖ संशोधन विषयाचे गृहितके :-

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतून चित्रित झालेली स्त्री जीवन : एक चिकित्सक अभ्यास - (विशेष संदर्भ – माती खालचे पाय, आमदार सौभाग्यवती, गणगोत, असं जगणं तोलाचं, तृप्ता) या संशोधन विषयाचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संशोधकाने खालील गृहीतकांची मांडणी केली आहे.

१. ग्रामीण कादंबऱ्यात स्त्रियांच्या जीवन चित्रणावर भर देण्यात आलेला आहे.

२. सद्यस्थितीत स्त्री जीवनविषयक झालेले चित्रण समकालीन ग्रामीण कादंबऱ्यातून येते.

३. ग्रामीण भागातील स्त्रिया आज शासकीय नोकरीमध्ये आपले कर्तव्य बजावत आहेत.

४. ग्रामीण भागातील स्त्रिया आज सक्षम तसेच प्रगतशील झालेल्या दिसून येतात.

५. ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवनावर आधारित साहित्यातील मूल्यांचा शोध घेणे.

❖ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन करत असताना विविध संशोधन पद्धतीचा आधार घेऊन संशोधन करण्यात येणार आहे. यामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, मूलभूत संशोधन पद्धती इत्यादी पद्धतीद्वारे संशोधन करण्यात येणार आहे.

❖ संशोधनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनकार्य हे ग्रामीण कांदबरीपुरते मर्यादित असून, प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवनाचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण कादंबरीतील स्त्रियांचे जीवन एवढ्यापुरतीच मर्यादा प्रस्तुत संशोधनाला आहे.

❖ संशोधन प्रकरणाची रचना :-

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत असताना त्यात सुयोग्यपणा यावा या हेतूने विषयाची रचना सहा प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण पुढीलप्रमाणे :-

संशोधन प्रकरणाचा संक्षिप्त आराखडा :-

❖ प्रकरण पहिले :-

➢ मराठी साहित्य निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

'मराठी भाषेत निर्माण झालेल्या मौखिक आणि लिखित स्वरूपातील साहित्याला मराठी साहित्य असे म्हणतात'. मराठीतील कादंबरी हा एक आधुनिक ललित साहित्य प्रकार आहे. इंग्रजी साहित्यातून प्रेरणा घेऊन कादंबरी हा साहित्यप्रकार भारतीय साहित्यामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेला आहे. मराठीतील कादंबरीचा जन्म कथा साहित्यातून किवा लोकसाहित्यातून झालेला आहे. कादंबरी या ललित साहित्य प्रकारचे इंग्रजी कादंबरीशी अधिक साम्य पाहायला मिळते. थोडक्यात इंग्रजी साहित्याच्या परिचयातून मराठीत

अनेक साहित्य प्रकार आलेले आहेत. त्यामध्ये कादंबरी या साहित्य प्रकाराचाही समावेश होतो.

मराठी भाषेतील पहिली कांदबरी भाषांतरित आहे. हरी केशवजी यांनी १८४१ मध्ये जॉन बन्वनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या कादंबरीचा 'यात्रिकक्रमण' हा अनुवाद केला गेला आहे. त्यानंतर बाबा पद्मनजी यांनी १८५७ मध्ये लिहिलेल्या 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी आहे. सोबतच ऐतिहासिक पार्श्वभूमी व साहित्य निर्मितीचा आढावा घेतला जाणार आहे.

❖ प्रकरण दुसरे :-

➢ मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीची वाटचाल :-

सदर प्रकरणात मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीकार तसेच त्यांचे कादंबरीविश्व यांचा आढावा घेणार आहोत.

कादंबऱ्यांमध्ये जीवनसंघर्ष, मूल्यसंघर्ष, राजकीय चित्रण यांचा देखील वेध घेण्यात आलेला आहे. याचं कादंबऱ्यांमध्ये स्त्री व्यक्ती रेखांचे चित्रण देखील पाहायला मिळते. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरी लेखनात स्त्रियांचे जीवन तसेच इतर घटनांचे उमटलेले प्रतिबिंब, मराठवाड्यातील काही ठळक शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक घटना घडल्या यांचे पडसाद कादंबरी लेखनात पडले आहे का ? यांचा शोध सदर प्रकरणात संशोधिका घेणार आहे.

❖ प्रकरण तिसरे :-

➢ मराठवाड्यातील स्त्रियांचे जीवन :-

मराठवाड्याचे स्वातंत्र्य हे भारतीय स्वातंत्र्यानंतरचे आहे. मराठवाड्यातील स्त्रियांचे जीवन सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बदलांचे प्रतिबिंब आहे. महिलांची स्थिती पारंपरिक कुटुंब संरचना, जातीय व्यवस्था तसेच पितृसत्ताक दृष्टिकोनामुळे प्रभावित होत

असताना दिसून येते. जे त्यांना घरगुती आणि शेतकामांमध्ये सीमित ठेवत असते. तसेच आधुनिक काळात महिलांचे सशक्तिकरण, शिक्षण व समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये सहभाग काही प्रमाणात प्रयत्न झालेले आहेत. महिला बचत गट, शैक्षणिक संधी, महिलांना आरक्षण तसेच नोकरीची संधी आणि समाजात बदलत्या दृष्टिकोनातून त्यांचा सामाजिक दर्जा सुधारलेला दिसून येत आहे. स्त्रियांचे जीवन हे सामाजिक संस्थेच्या मार्गावर होणाऱ्या संघर्षाच्या आणि बदललांचे प्रतीक असताना दिसत असते. एकूणच मराठवाड्यातील स्त्रियांचे जीवन कसे आहे याचा शोध या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

❖ प्रकरण चौथे :-

➢ मराठवाड्यातील स्त्री जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या :-

सदरील प्रकरणात मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीकारांच्या कादंबरीच्यामधून स्त्री जीवन विषयक जाणीवेच्या संदर्भाचे प्रसंग कसे आले आहेत. त्यामधून मानवी प्रवृत्तीच्या व वैशिष्ट्यांचा वेध कसा घेतला आहे. मानवी मनाचे निरीक्षण, यांच्या वर्तनाचे स्वभाव गुणधर्माचे व स्त्री जीवनाचे चित्रण कसे केले आहे. त्याचा या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, कशा स्वरूपाचा आहे. अशा अनेक महत्वपूर्ण बाबी प्रस्तुत प्रकरणात संशोधिका चिकित्सकपणे अभ्यासणार आहे.

❖ प्रकरण पाचवे :-

➢ निवडलेल्या ग्रामीण कादंबरीतून येणारे स्त्रियाचे जीवन :-

सदरील प्रकरणात ग्रामीण कांदबरीतून येणारे स्त्रियांचे जीवन हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. समाजात असलेले स्त्रियांचे स्थान व स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन आपल्याला कादंबरीतून पाहायला मिळत असतो.

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतून येणारे स्त्रियांचे व्यक्तिमत्व, समाज व्यवस्थेतील तिचे स्थान, तिच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन एकंदरीतच तिच्या स्वभावाचे विविध पैलू निवड कादंबऱ्यांच्या आधारे शोधण्यात येणार आहे. स्त्री जीवनाचे चित्रण आलेल्या ह्या कादंबऱ्या वेगवेगळ्या कालखंडातील व वेगवेगळ्या प्रदेशातील आहेत.

❖ प्रकरण सहावे :-

➢ निष्कर्ष आणि समारोप :-

"मराठवाडयातील ग्रामीण कादंबरीतून चित्रित झालेले स्त्री जीवन एक चिकित्सक अभ्यास" या प्रस्तुत विषयासंदर्भात शोधप्रबंधांमध्ये प्रत्येक प्रकरणाचे केलेले संशोधन आणि संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष तपशीलवारपणे केलेली त्यांची मांडणी व समारोप या प्रकरणात नोंदविण्यात येणार आहे.

❖ संदर्भसूची :-

१. मराठी साहित्य संशोधन स्वरूप आणि दिशा - डॉ. श. रा. राणे प्रकाशन,का. स. वाणी, मराठी प्रगत अध्ययन संस्था, उन्नतीनगर देवपूर, धुळे.

२. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध - डॉ. नागनाथ कोतापल्ले मेहता पब्लिशिंग, पुणे.

३. आधुनिक मराठी वाङ्‌यांचा इतिहास - देशापांडे अ .ना. - व्हीनस प्रकाशन - पुणे.

४.ग्रामीण वाङ्‌मयाचा इतिहास - डॉ. चंद्रकुमार तलगे (संपा) - सुरेश एजन्सीज, पुणे.

५.मराठी ग्रामीण कादंबरी - डॉ. रवीद ठाकूर - मेहता पब्लिशिंग, पुणे.

६. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि दिशा - डॉ. वासुदेव मुलाटे - कैलाश प्रकाशन, संभाजीनगर.

७.ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्य - डॉ. आनंद यादव - मेहता पब्लिशिंग, पुणे.

८.मराठी ग्रामीण साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया - गो. म. कुलकर्णी - मेहता पब्लिशिंग, पुणे.

९. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरीची वाटचाल - डॉ. शंकर विभूते - स्वरूप प्रकाशन 'अक्षर' ८५८ सह्याद्रीनगर, एन ५ (दक्षिण) संभाजीनगर.

❖ आधारभूत निवडक कादंबऱ्या :-

१. माती खालचे पाय - बाबू बिरादार.

२. आमदार सौभाग्यवती - रा.रं. बोराडे.

३. गणगोत - गणेश आवटे.

४.असं जगणं तोलाचं - शेषराव मोहिते.

५.तृप्ता - रेखा बैजल

संशोधक
वैशाली श्रीरंग पतंगे

मार्गदर्शक
प्रा. डॉ. एम. आर. जाधव
मराठी विभाग प्रमुख
व संशोधन मार्गदर्शक,
नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा
बाळापूर ता. कळमनूरी जि.हिंगोली.